# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१९

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### मुंबईत लोकल गाड्यातुन प्रवास करणाऱ्या महिलांच्या सुरक्षेकरिता पोलीस बळ पुरविण्याबाबत

**(१) २९६१३ (२१-०१-२०१६) ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत लोकल रेल्वेच्या महिला डब्यातून प्रवास करणा-या लाखो प्रवाशांच्या सुरक्षेची जबाबदारी ही फक्त ६०० पोलीसांवरच असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महिला प्रवाशांच्या सुरक्षेसाठी पोलीसांच्या संख्येत वाढ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-१२-२०१८) :** (१) हे खरे नाही.

सन २०१५ मध्ये मुंबई रेल्वे पोलीसांच्या मदतीस होमगार्ड कर्मचा-यांची देखील महिला प्रवाशांच्या सुरक्षेकामी नियुक्ती करण्यात येत होती तसेच गृह विभाग,शासन निर्णय दि.०९.०८.२००४ अन्वये मुंबई लोहमार्ग आयुक्तालयातील उप नगरीय लोकल गाड्यातून प्रवास करणा-या महिलांच्या सुरक्षेकरिता ५०० होमगार्ड कर्मचारी रेल्वे पोलीसांच्या मदतीकरिता मंजूर करण्यात आले होते.

(२) सद्यस्थितीत महिला प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेता मुंबई रेल्वे कार्यक्षेत्रातील महिला प्रवाशांच्या सुरक्षेकरिता गृह विभाग,शासन निर्णय दि.३०.०६.२०१७ अन्वये महाराष्ट्र सुरक्षा महामंडळाचे २०० सुरक्षा कर्मचारी मंजूर करण्यात आले आहेत व गृह विभाग,शासन निर्णय दि.२२.०२.२०१८ अन्वये मुंबई रेल्वे पोलीसांच्या मदतीकरिता अतिरिक्त १५०० होमगार्ड मंजूर करण्यात आले आहेत.

सद्यस्थितीत रात्री २०.३० वा.ते सकाळी ०६.३० वा.पर्यंत धावणा-या सर्व उपननगरिय लोकल रेल्वे गाड्यांच्या जास्तीत जास्त महिला राखीव डब्यातून रेल्वे पोलीस, होमगार्ड व महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ कर्मचारी यांची संयुक्तरित्या सुरक्षेकामी नियुक्ती केली जाते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अंधेरी (पूर्व) येथील विमानतळ वाहतूक पोलीस चौकीकरीता जागा व निधी उपलब्ध होत नसल्याबाबत

**(२) ३७१३२ (२१-०१-२०१६) श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी (पूर्व) येथील विमानतळ वाहतूक पोलीस चौकीकरीता स्थानिक लोकप्रतिनिधींनी मुंबई उपनगर जिल्ह्यांच्या जिल्हा नियोजन समितीमध्ये एक वर्षापूर्वीपासून सातत्याने निधी व जागेची मागणी केली असता मा.पालकमंत्री महोदयांनी जागा व निधी उपलब्ध करुन देण्याचे आश्वासन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त आश्वासनानुसार जिल्हा नियोजन समितीच्या यंत्रणेमार्फत अंधेरी (पूर्व) विमानतळ वाहतूक पोलीस चौकीचा प्रस्ताव सादर करुन जागा व निधी उपलब्ध करुन घेण्याबाबत कोणतीही कार्यवाही केली नसल्याबाबत संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या विरोधात कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) तसेच मागणी प्रलंबित असतांना अस्तित्वात असलेली विमानतळ वाहतूक चौकी मा.आयुक्त महानगरपालिका व सहआयुक्त वाहतूक यांनी स्वत: उपस्थित राहून तोडून घेतली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर विमानतळ वाहतूक पोलीस चौकी तेथून तोडून पश्चिम द्रुतगती मार्गावर अंधेरी उड्डाणपुलाखाली कंटेनर स्वरुप कार्यालयात स्थलांतरीत करण्यात आले असून या कंटेनर कार्यलयात महिला पोलीस कर्मचाऱ्यांना गणवेश बदलण्याची तसेच प्रसाधनाची व्यवस्था नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०१-२०१९) :** (१) जिल्हा नियोजन समितीच्या दिनांक २२/०६/२०१६ रोजीच्या बैठकीत मा. पालकमंत्री यांनी मुंबई उपनगर जिल्ह्यातील पोलीस चौकी बांधण्याबाबत निधीची आवश्यकता लागल्यास जिल्हा नियोजन समितीकडून निधी उपलब्ध करुन देण्याबाबत नमूद केले आहे.

(२) उड्डाणपुलाखाली वाहतूक पोलीस चौकी उभारण्याबाबत संचालक, मुंबई ट्रान्सपोर्ट सपोर्ट युनिट महाराष्ट्र राज्य, मुंबई तसेच, सचिव, मुंबई ट्रान्सपोर्ट सपोर्ट युनिट महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेशी क्षेत्रीय स्तरावर पत्रव्यवहार करण्यात आला आहे.

(३) हे खरे नाही.

वाहतुकीस अडथळा होत असल्याने बृहन्मुंबई महानगरपालिकेने सदर चौकीचे निष्कासन केले असून त्यावेळी फक्त सहायक आयुक्त, के/पूर्व विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका हे उपस्थित होते.

(४) व (५) उक्त चौकीचे कार्यालय हे अंधेरी उड्डाणपुलाखाली कंटेनरमध्ये सुरु करण्यात आले असून सदर कंटेनरमध्ये तात्पुरत्या स्वरुपात महिला पोलीस कर्मचाऱ्यांना कपडे बदलण्याकरिता व्यवस्था व प्रसाधनगृहाची व्यवस्था करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील मराठवाड्यात दुष्काळ परिस्थितीत बालकामगारांचे प्रमाण वाढल्याबाबत**

**(३) ५०८९५ (३०-०४-२०१६) ॲड.वारीस पठाण (भायखळा), श्री.शिवाजीराव नाईक (शिराळा), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मराठवाड्यात दुष्काळाच्या भीषण संकटात ऊस, वीटभट्टी, बांधकाम, चहाच्या टपऱ्या, हॉटेल्स, घरकाम इत्यादी सर्व ठिकाणी बालकामगारांचे प्रमाण आधीच्या तुलनेत यावर्षी १५ ते २० टक्क्यांनी जास्त असल्याचे सामाजिक संस्थांच्या पाहणीत माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुलांच्या हक्काचे संरक्षण करण्यासाठी गावपातळीपासून ते शहर पातळीवर समित्या नियुक्त करण्याचे सरकारी आदेश असूनही बऱ्याच गावात समित्याच अस्तित्वात नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नैसर्गिक आपत्तीचा मोठा फटका मुलांना बसत असुनही त्यावर शासनातर्फे नियोजनाची अंमलबजावणी काटेकोरपणे केली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बालकामगारांचे प्रमाण कमी करण्याबाबत शासनामार्फत कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (३०-११-२०१८) :** (१) हे खरे नाही,

(२) महिला व बाल विकास विभागाच्या शासन निर्णय दिनांक १०.०६.२०१४ अन्वये एकात्मिक बाल संरक्षण योजना या केंद्र शासन पुरस्कृत योजनेच्या अनुषंगाने ग्राम बाल संरक्षण समिती, नगर बाल संरक्षण समिती, तालुका बाल संरक्षण समिती मुलांच्या हक्काचे संरक्षणासाठी प्रतिबंधात्मक आणि उपचारात्मक कार्य करण्यासाठी आतापर्यंत एकूण २०६५१ समित्या स्थापित करण्यात आलेल्या आहेत.

(३) व (४) मदत व पुनर्वसन या विभागाकडून दरवर्षी खरीप व रब्बी हंगामात दुष्काळाचे मुल्यांकन करुन त्यानुषंगाने तात्पुरत्या स्वरुपाच्या उपाययोजना करण्यात येतात. सदर उपाययोजनेमध्ये बालकामगारांशी संबंधित कोणतीही उपाययोजना अंतर्भूत नाही.

नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेली मुले ही बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ च्या कलम २ (१४) नुसार काळजी व संरक्षणाची गरज असलेली मुले आहेत. सबब, अधिनियमातील तरतूदींच्या अनुषंगाने अशा मुलांच्या पुनर्वसनासाठी आवश्यक कार्यवाही महिला व बाल विकास विभागाकडून करण्यात येते.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वसई (जि.पालघर) येथील औद्योगिक वसाहतीमधील कारखान्यांमध्ये आग लागून घडलेल्या दुर्घटनांबाबत

**(४) ६०७८२ (२२-०८-२०१६) श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई (जि.पालघर) येथील औद्योगिक वसाहतीमधील कारखान्यांमध्ये आग लागून दुर्घटना घडल्याच्या किती घटना माहे जानेवारी, २०१५ पासून ते मे, २०१६ अखेरपर्यंतच्या कालावधीत घडल्या आहेत व त्यामध्ये किती जीवितहानी व वित्तहानी झाली,
(२) असल्यास, दुर्घटनाग्रस्त व्यक्तींना कोणत्या स्वरुपाची मदत शासनाने केली आहे,
(३) असल्यास, संभाव्य दुर्घटनांना प्रतिबंधीत करण्याच्यादृष्टीने कोणत्या खबरदारीच्या उपाययोजना शासनाने केल्या वा करण्यात येत आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (३०-११-२०१८) :** (१) तालुका वसई (जि.पालघर) येथील औद्योगिक वसाहती मधील कारखाने अधिनियम, १९४८ अंतर्गत नोंदणीकृत कारखान्यांमध्ये जानेवारी, २०१५ पासून ते मे, २०१६ अखेर पर्यंतच्या कालावधीत आग लागून जिवीतहानी व वित्तहानी झाल्याची नोंद संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, मुंबई यांचे कार्यालयात झालेली नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाद्वारे केंद्रीय निरिक्षण प्रणालीमार्फत नोंदणीकृत रासायनिक कारखान्यांचे प्राधान्याने निरिक्षण केले जाते. निरिक्षणाच्यावेळी आढळलेल्या भंगाबाबत कायदेशीर कारवाई केली जाते व त्रूटींची पुर्तता करण्याच्या सूचना दिल्या जातात. तसेच कारखान्यामध्ये नियमितपणे रंगीत तालिम (Mock Drill) वर्षातून दोनदा घेऊन दुर्घटना हाताळण्याचे सराव केले जातात. महाराष्ट्र सुरक्षा लेखा परिक्षण नियम २०१४ नुसार, रासायनिक व अतिधोकादायक कारखान्यांचे शासन मान्यता प्राप्त सुरक्षा लेखा परिक्षकांकडून (Safety Auditor) सुरक्षा लेखा परिक्षण केले जाते.

---

**मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत**

**(५) ७८५८६ (१३-०४-२०१७) श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर सततच्या होणाऱ्या अपघातामुळे तसेच बेशिस्तीने चालविणाऱ्या वाहनाबाबत जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती सिंधुताई सकपाळ यांनी उर्से टोल नाक्यावर (जि.पुणे) येथे आयआरबीच्या अधिकाऱ्यांकडे दिनांक १८ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती शासनाने या महामार्गावरील अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-१२-२०१८) :** (१) हे खरे आहे.

दिनांक १८ जानेवारी, २०१७ रोजी उर्से टोल नाका येथे जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या सिंधुताई सकपाळ यांनी मुंबई पुणे द्रुतगती मार्गावर बेशिस्तीने चालणाऱ्या वाहनांबाबत आयआरबीच्या कर्मचाऱ्यांकडे तिव्र नाराजी व्यक्त केली व तशा तोंडी सूचना दिल्या. याबाबत कुठल्याही स्वरुपाची लेखी तक्रार करण्यांत आली नाही.

(२) व (३) माहे जानेवारी ते सप्टेंबर, २०१८ या कालावधीत मुंबई पुणे द्रुतगती मार्गावर लेनकटिंग करणाऱ्या वाहन चालकांवर कारवाई करुन ७१,७८४ केसेस करुन रु. १.४३ कोटी इतका दंड आकारण्यांत आला आहे.

अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी महामार्ग पोलीस विभागामार्फत वाहनचालकांना सिटबेल्ट, हेल्मेट व इतर वाहतुकीच्या नियमांबाबत समुपदेशन केले जाते. द्रुतगती मार्गावर माहे मार्च, २०१८ ते जुलै, २०१८ या कालावधीत ३५१ वाहनचालकांचे समुपदेशन करण्यांत आले असून १३,९८२ वाहनचालकांना समजपत्र बजावण्यांत आले आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

**राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील किमान तीन लाख कामगार गत दोन वर्षांपासून वेतनापासून वंचित असल्याबाबत**

**(६) ८९३६२ (०४-०९-२०१७) श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील किमान तीन लाख कामगार गत दोन वर्षांपासून वेतनापासून वंचित असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संघटीत आणि असंघटीत कामगारांना किमान वेतन मिळावे हा त्यांचा हक्क असून या संस्थांनी हे वेतन न दिल्यास या संस्थांना अस्तित्वात राहण्याचा अधिकारही नसल्याचा निर्वाळा मा.सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, असे असतानाही पाच हजार कोटींचे वेतन थकीत ठेवून कामगारांना वेतनापासून वंचित ठेवण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदर तीन लाख कामगारांना वेतन मिळवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (१४-१२-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर शहरातील एका महिलेची आखाती देशात विक्री केल्याबाबत

**(७) ८९८८६ (०४-०९-२०१७) डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील एका महीलेची २ लाख रूपयात सौदी अरब आखाती देशात विक्री केल्याची बाब माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वेठबिगार तसेच घरकामाकरीता सदर महिलेस विकण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शसानाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर प्रकरणातील आरोपी अखीर बेगम, आसमा खालीद व अब्दुल्ला नामक दलालांवर कारवाई करण्याबाबत व सदर महिलेस परत आणण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-११-२०१८) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) फिर्यादीने दिलेल्या तक्रारीनुसार सक्करदरा पोलीस ठाणे, नागपूर शहर येथे गु.र.नं. १६४/१७ भा.दं.वि. कलम ४२०,३७०,३४२, ३७४,३२३,३२४,५०४प्रमाणे आरोपीतांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्ह्यातील आरोपी क्र. १ महिलेस दि. २४/०७/२०१७ रोजी अटक करून

सखोल विचारपूस जवाब नोंदवून तिला मा.उच्च न्यायालयाने अटक पूर्व जामिन मंजूर केला असल्याने तात्काळ मुक्त केले. सदर गुन्ह्यातील सदर महिले सोबत इतर आरोपींतांचा शोध घेणे करीता सदर गुन्ह्याचे तपासी अधिकारी दुस-यांदा मुंबई येथे गेले असता आरोपी क्र.२ याचा डोंगरी व वडाळा परीसरात शोध घेण्यात आला परंतु आरोपीचा पत्ता अपुरा असल्याने तसेच फोटो नसल्याने आरोपी क्र. २ चा शोध लागु शकला नाही. आरोपींचा पुर्ण नाव, पत्ता व फोटो अप्राप्त असल्याने लुक आऊट ची प्रोसीजर करण्यात आली नाही. सौदी अरब मध्ये असलेल्या आरोपी क्र. ३, ४ व ५ बाबत माहिती अप्राप्त असल्याने एक्सट्राडीशनची प्रक्रिया करण्यात आलेली नाही.नमुद गुन्ह्यातील आरोपी क्र.१ विरूध्द प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी क्र.१ येथे दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे. सदर गुन्ह्याचा कलम १७३(८) जा.फौ. प्रमाणे तपास सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## देशातील पहिले कौशल्य विकास विद्यापीठ राज्यात स्थापण्यासाठीच्या प्रस्तावाबाबत

**(८) ९०११३ (०४-०९-२०१७) श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.विलासराव जगताप (जत), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बांधकाम व्यवसायात पाच वर्षात ३ कोटी कुशल मनुष्यबळाची, वाहन उद्योगात सुमारे ४० लाख मनुष्यबळाची आणि वाहतूक क्षेत्रात ५ लाख मनुष्यबळाची
आवश्यकता असून प्रशिक्षित मनुष्यबळाकरीता मेक इन इंडियासाठी उपयुक्त असलेल्या कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत देशातील पहिले कौशल्य विकास विद्यापीठ राज्यात मुंबईमध्ये सुरु करण्याचा प्रस्ताव विचाराधीन असून त्यासाठीचा प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्याच्या सूचना केंद्रीय कौशल्य आणि उद्योजकता राज्यमंत्री यांनी दिल्यानंतर सहा महिन्यांचा कालावधीनंतरही शासनाने केंद्र शासनास प्रस्ताव सादर केलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच, निती आयोगाच्या अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या कौशल्य विकास उप समितीने सादर केलेल्या अहवालात पुणे येथे प्रशिक्षण देण्याकरीता ४० कौशल्यांची निवड करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रस्तावित कौशल्य विकास विद्यापीठाच्या कार्यकक्षा व त्याद्वारे राबवावयाचे उपक्रम यांचे स्वरुप साधारणत: कशा प्रकारे निश्चित करण्याचे शासनाने ठरविलेले आहे व त्यामधून कोणते साध्य अपेक्षिलेले आहे,

(४) असल्यास, देशातील पहिले कौशल्य विकास विद्यापीठ स्थापण्याच्या उक्त प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्याबाबत अद्यापपर्यंत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२७-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही

---

**पुण्यातील केशवराव जेधे चौकात, स्वारगेट येथे बस थांबे समोर थांबण्याऐवजी बहुतांशी पीएमपीएमएलच्या बस रस्त्यांच्या मध्यभागी थांबत असल्याबाबत**

**(९) ९३५३२ (०४-०९-२०१७) श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुण्यातील केशवराव जेधे चौकात, स्वारगेट येथे बस थांबे समोर थांबण्याऐवजी बहुतांशी पीएमपीएमएलच्या बस रस्त्यांच्या मध्यभागी थांबत असल्याने प्रवाशांची गैरसोय होत असल्याची बाब दिनांक २१ मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्वारगेट पोलीस ठाणे, एसटी बस स्थानकाचे प्रवेशद्वार, बस स्थानक, जिजाऊ उपहारगृह, वारजे-माळवाडी बसथांबा या ठिकाणी खासगी टॅक्सी व पियाजोमधून मोठ्या प्रमाणात अवैध वाहतूक होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वाहतूक पोलिस या बेशिस्तीकडे दुर्लक्ष करीत असून परगावचे वाहन दिसताच बाजूला घेऊन त्यांच्याकडून पावत्या फाडण्यालाच प्राधान्य देत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार शासनाने उक्त विषयी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-११-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) नमूद ठिकाणी अवैध प्रवासी वाहतूक होत असल्याचे आढळून आल्याने पुणे शहर वाहतूक शाखेकडून सन २०१७ मध्ये ५३ वाहनांवर तर सन २०१८ मध्ये ४१ वाहनांवर मोटार वाहन कायदा कलम ६६(अ) / १९२ प्रमाणे मोटार वाहन न्यायालयात खटले दाखल करण्यांत आले आहेत.
(३) वाहतूक शाखेकडील पोलीस अधिकारी व कर्मचारी हे, जे वाहनचालक वाहतूक नियमांचा भंग करतील अशा सर्व वाहनचालकांवर मोटार वाहन कायद्याप्रमाणे कारवाई करतात. त्यामध्ये कोणताही दुजाभाव केला जात नाही.

(४) व (५) केशवराव जेधे चौकात वाहनांच्या गर्दीच्या वेळी वाहतूक पोलीसांव्यतिरिक्त पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून दोन वाहतूक नियंत्रकांची नेमणूक करण्यांत आली असून बसेस रस्त्याच्या मध्यभागी थांबू नयेत याकरीता रस्त्यावर लोखंडी बॅरिकेटस लावून त्या आतून बसेस घेऊन प्रवाशांची चढउतार करण्यांत येत आहे. तसेच गर्दी होऊ नये याकरीता रस्त्यांवरील फेरीवाले, अतिक्रमणे काढणे इ. संदर्भात पुणे महानगरपालिकेशी पत्रव्यवहार करण्यांत आला आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईमध्ये मुंबई पोलीस दलाकडून ६० बांगलादेशी नागरिकांना अटक केल्याबाबत

**(१०) ९५२६९ (०६-०१-२०१८). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईमध्ये मुंबई पोलीस दलाकडून ६० बांगलादेशी नागरिकांना अटक केल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच, राज्यामध्ये विशेषतः मुंबई, ठाणे, रायगड इ. मोठ्या शहरांमध्ये बांगलादेशी नागरिकांचे प्रमाण जास्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर बांगलादेशी नागरिकांकडे भारतीय पारपत्रे, ओळखपत्रे व इतर कागदपत्रांचा पुरावाही सापडला असून त्यांना सदर कागदपत्रे उपलब्ध करून देणाऱ्यां टोळ्या कार्यरत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार राज्यातील बांगलादेशी घुसखोरांवर व त्यांना कागदपत्रे पुरविणाऱ्या टोळ्यांवर शासनामार्फत कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-१२-२०१८) :** (१) माहे ऑक्टोबर २०१७ मध्ये मुंबई पोलीस दलाने ८२ घुसखोर नागरिकांवर कारवाई केली आहे.
(२) राज्यात माहे नोव्हेबर, २०१७ पर्यत बृहन्मुंबई-८२, नवी मुंबई-१, ठाणे शहर-४४, ठाणे (ग्रामीण)-३१ बांग्लादेशी नागरिक आढळून आले. त्यांचेवर कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.
(३) व (४) अवैध बांग्लादेशी नागरिकांविरुध्द करण्यात आलेल्या कारवाईत बांग्लादेशी नागरिकांकडे भारतीय कागद पत्रांचा पुरावा सापडला आहे. असला त्यांना सदर कागदपत्रे उपलब्ध करुन देणाऱ्या टोळ्या कार्यरत असल्याचे बृहमुंबई वगळता इतर ठिकाणी निदर्शनास आलेले नाही. तथापि, बृहन्मुंबई महानगर पालिकेतील कुर्ला एल विभागातील जन्म मृत्यु नोदंणी अधिकारी तसेच सिस्टम ॲनालायसेस प्रोडक्ट डाटाबेस (सॅप कार्यप्रणाली) चे अधिकारी यांनी बांग्लादेशी नागरिकांना भारतीय कागदपत्रे उपलब्ध करुन देण्याकामी प्रत्यक्ष / अप्रत्यक्षरित्या मदत केल्याचे तपासात आढळून आले, त्यामुळे त्यांचे विरुध्द कलम ४६५, ४६७,

४६८, ४७१, ४२०, ३४ भा.द.वि. सह पासपोर्ट ॲक्ट १९६७ कलम १२ सह आधार कायदा कलम ३४ सह ४० लोक प्रतिनिधी अधिनियम कलम ३१ अन्वये दिनांक २७.१२.२०१६ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला असून सदर गुन्ह्याचा तपास सुरू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### नाशिक येथील शरणापूर रोड परिसरातील तिबेटीयन मार्केटमध्ये झालेला स्फोट

**(११) ९५६४७ (०६-०१-२०१८) श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक येथील शरणापूर रोड परिसरातील तिबेटीयन मार्केटमध्ये दिनांक ९ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास स्फोट झाल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त घटनेची शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नूसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-१२-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे. तथापि, सदर घटना दि.०७/१०/२०१७ रोजी घडली आहे.
(२) व (३) या प्रकरणातील आरोपीने नाशिक येथील स्वत:च्या मालकीच्या तिबेटीयन मार्केट लाईन नं. १ येथील गाळा नं. ३ येथे लिकेज असलेला गॅस पाईप, गॅस सिलेंडरला लावल्याने गॅस गळती होवून स्फोट झाल्याचे निदर्शनास आले आहे. यावेळी आरोपीने सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणतीही व्यवस्था केलेली नव्हती. तसेच सदर दुर्घटनेची माहिती आरोपीने पोलीसांना विलंबाने दिली. या प्रकरणी आरोपी विरुध्द गु.र.क्र.३४९/१७, भा.दं.वि.कलम २८६ अन्वये दि.७/१०/२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीस दि.०८/१०/२०१७ रोजी अटक करण्यात आली असून आरोपी जामीनावर मुक्त आहे. सद्यस्थितीत गुन्हा पोलीस तपासावर आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

### कोलाड-भिरा मार्गावरील (जि.रायगड) विळे-भागाड येथील रस्त्यांच्या रुंदीकरणाबाबत

**(१२) ९६२१९ (२९-१२-२०१७) श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोलाड-भिरा मार्गावरील (जि.रायगड) विळे-भागाड येथे औद्योगिक वसाहतीमुळे अवजड वाहनांच्या वाहतुकीचे प्रमाण वाढल्याने अपघाताचा धोका वाढल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भागातील अवजड वाहनांच्या वाहतूकी संदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(३) असल्यास, सदरहू रस्त्यांच्या रुंदीकरणाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-१२-२०१८) :** (१) कोलाड-भिरा मार्गावर कोलाड पोलीस ठाणे हद्दीत सन २०१७ मध्ये मौ.पहूर गांवाचे हद्दीत दिनांक १३.०१.२०१७ रोजी मोटार अपघात क्रमांक ०१/२०१७, व मौ.वाळंजवाडी गांवाचे हददीत दिनांक १८.०२.२०१७ रोजी मोटार अपघात क्रमांक ४/२०१७ असे अपघात दाखल आहेत.

(२) व (३) कोलाड ते विळे हा रस्ता माणगांव तालुक्यातील विळे भागाड औद्योगिक वसाहतीस जोडणारा २१.०० कि.मी. लांबीचा रस्ता असून तो प्रमुख राज्य मार्ग दर्जाचा रस्ता आहे. सदर रस्त्याचा पृष्ठभाग डांबरी स्वरुपाचा असून रुंदी ७.०० मीटर इतकी आहे. सदरची रुंदी ही एकूण दोन मार्गिका इतकी आहे. या रस्त्यावरुन प्रामुख्याने पोलीदाची अवजड वाहतूक होत असते. सद्य:स्थितीत रस्त्याचा पृष्ठभाग खराब अवस्थेत असून रस्त्याच्या मजबुतीकरणाची व नुतनीकरणाची कामे मंजूर आहेत. सद्य:स्थितीत रस्त्याच्या रुंदीकरणाची आवश्यकता नाही.

त्याचप्रमाणे विळे ते पाटणूस हा ५ कि.मी.लांबीच्या रुंदी २.०० कि.मी.भागापर्यंत ५.५० मी. इतकी आहे तर उर्वरित ३.०० कि.मी. भागामध्ये ३.७५ मी. इतकी आहे. सदर रस्त्याचा पृष्ठभाग खराब असून संपूर्ण रस्त्याची रुंदी ५.५० मी. करणे व संपूर्ण पृष्ठभाग नुतनीकरण करणे ही कामे मंजूर असून उपरोक्त सर्व कामांस तांत्रिक मान्यता प्राप्त असून निविदा मागविण्यांत आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रेल्वेच्या बाटलीबंद पाणी पुरविणारी स्वतंत्र ग्रेट इंडियन पेनन्सुला (अंबरनाथ येथील जेपी) धरणात मृतदेह सापडला असल्याबाबत

**(१३) ९६५३० (२९-१२-२०१७). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रेल्वेत बाटलीबंद पाणी पुरविल्या जाणाऱ्या स्वतंत्र ग्रेट इंडियन पेनन्सुला (अंबरनाथ येथील जेपी) धरणात मृतदेह सापडला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार रेल्वेत पुरविल्या जाणाऱ्या पाण्याच्या धरणाच्या सुरक्षिततेबाबत व रेल्वे प्रवाशांना पिण्याचे शुध्द पाणी अल्पदरात उपलब्ध करुन देण्यासाठी पाण्याचा अन्य स्त्रोत उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-१२-२०१८) :** (१) हे खरे आहे.

दिनांक ११.०९.२०१७ रोजी शिवाजीनगर पोलीस ठाणे (अंबरनाथ) हद्दीतील जे.पी.धरणाच्या पाण्यामध्ये एका अनोळखी पुरुषाचा मृतदेह आढळून आला आहे.

(२) याप्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे अ.मृ. रजि. नं. ६५/२०१७, भा.दं.वि. १७४ अन्वये दिनांक ११.०९.२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यांत आला असून पुढील तपास सुरु आहे.

रेल्वे प्रवाशांना आय.आर.सी.टी.सी. या रेल्वे च्या अखत्यारितील महामंडळामार्फत व्यावसायिक दराने पिण्याचे पाणी उपलब्ध करुन दिल्या जाते. रेल्वे प्रवासी अथवा रेल्वे कर्मचारी यांचेकरीता अंबरनाथ येथील आय.आर.सी.टी.सी. च्या अखत्यारितील धरणातील पाण्याचा उपयोग केला जात नाही. कल्याण स्थानक आणि तेथील वसाहत याकरीता कल्याण डोंबिवली महानगरपालिकेकडून प्रकिया केलेले पिण्याचे पाणी उपलब्ध होत असल्याने रेल्वेला पाण्याचा अतिरिक्त स्त्रोत निर्माण करण्याची आवश्यकता वाटत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रावेर (जि.जळगाव) मतदार संघातील पोलीस कर्मचा-यांची रिक्त असलेली पदे भरणेबाबत**

**(१४) ९९८१० (०६-०१-२०१८). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रावेर (जि.जळगाव) मतदारसंघात ४ पोलीस स्टेशन असून येथील पोलीस कर्मचा-यांची पदे रिक्त असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपु-या पोलीस संख्येमुळे पोलिसांना काम करण्यासाठी अडचणी निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कार्यालयांमध्ये पोलीसांची कमतरता असल्यामुळे गुन्हेगारीमध्ये वाढ होत असल्याचे तालुकावासीयांकडून तक्रार होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू कार्यालयांमध्ये पोलीस कर्मचा-यांची रीक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-११-२०१८) :** (१) रावेर (जि.जळगाव) मतदारसंघात ५ पोलीस स्टेशन असून एकुण २२२ इतकी मंजूर पदे आहेत. त्यापैकी ३५ पदे रिक्त आहेत.

(२ व (३) हे खरे नाही.

(४) रिक्त झालेल्या पदांची भरती सन २०१८ च्या मार्च-एप्रिल मध्ये पुर्ण झाली आहे. भरती झालेल्या उमेदवारांची मुलभूत प्रशिक्षणानंतर सर्व संबंधित पोलीस ठाण्यात नियुक्ती करण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**खालापूर (जि.रायगड) टोल नाक्यावर पोलीसांनी बीफ वाहतूक करणारा कंटेनर पकडल्याबाबत**

**(१५) १०५०३२ (०७-०४-२०१८) श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खालापूर पोलीसांनी (जि.रायगड) दिनांक १५ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास खालापूर टोल नाक्यावर बीफ वाहतूक करणारा कंटेनर पकडला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी किती जणांना अटक करण्यात आली आहे व त्यांचेवर कोणत्या कलमान्वये कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-१२-२०१८) :** (१) हे खरे आहे.

परंतु सदरची घटना ही दिनांक १४.१२.२०१७ रोजी सुमारे ०५.०० च्या सुमारास सावरोली (ता.खालापूर) गांवाचे हद्दीत घडली आहे.
(२) या प्रकरणी दोन आरोपींना (रा.हरयाणा राज्य) अटक करण्यात आली असून त्यांचेवर गु.र.क्र. २६०/२०१७ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम, १९७६ (सुधारणा २०१५) चे कलम ५(ब), ५(क), ६, ११ सह भा.दं.वि. कायदा कलम ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्ह्याचा तपास पूर्ण झाला असून गुन्ह्यातील प्रमुख आरोपी याचा कलकत्ता येथे जाऊन शोध घेतला असता तो मिळून आला नाही. त्यामुळे सदर आरोपीविरध्द सीआरपीसी २९९ प्रमाणे तर इतर आरोपींविरुध्द मा.न्यायालयात दोषारोप दाखल करण्यांत आले आहे
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मु.पो.ता. जालना येथील अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या महिला राजपत्रित अधिकाऱ्याचा करण्यात आलेला विनयभंग**

**(१६) १०५०६६ (१२-०४-२०१८) श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मु.पो.ता.जि.जालना येथे अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या महिला राजपत्रित अधिकारी यांच्यावर जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा सहाय्यक प्रकल्प अधिकारी या पदावर कार्यरत असताना तत्कालीन जालना जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी दीपक चौधरी याने ॲन्टी चेंबरमध्ये बोलवून विनयभंग व अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केल्याचा निषेध करण्याकरीता, राज्यभर तसेच मुंबईत वांद्रे येथील मुख्यालयात, मंत्रालय, नवीन प्रशासन भवनामध्ये अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या कर्मचाऱ्यांनी संबंधीत दोषी अधिकाऱ्यांविरुध्द तातडीने कारवाई करण्याची जाहिर मागणी करीत कामबंद आंदोलन करुन निषेध नोंदविल्याची बाब दिनांक १६ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास उघडकीस आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.दीपक चौधरी या अधिकाऱ्याने दिनांक २ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास, संबंधीत राजपत्रित महिला अधिकाऱ्यांस अॅन्टी चेंबर मध्ये बोलवून विनयभंग व अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न करुनही या महिलेची तक्रार संबंधीत पोलीस स्टेशनमध्ये दाखल करुन घेण्यास हेतूत: विलंब करण्यात आला, तसेच आवश्यक ते सीसीटिव्ही फुटेज संबंधीत महिलेला उपलब्ध करुन न देणे, जि.प.महिला कर्मचाऱ्यांकडून मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या चारित्र्याचे प्रमाणपत्र गोळा केले जाणे इ.संशयास्पद प्रकार घडत असल्याने राज्यात सर्वत्र या घटनेचा कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लावून निषेध केला, तरीही संबंधीत दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कोणतीच कारवाई न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) असल्यास, या प्रकरणाचा तपास करण्यात आला आहे काय, तपासाचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार संबंधीत दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-११-२०१८) :** (१) होय हे खरे आहे.

सदर घडलेल्या घटनेचा निषेध करण्याकरीता अर्थ व सांख्यिकी संचालनालय अधिकारी/कर्मचारी संघटना (शासनमान्य) यांनी दिलेल्या निवेदनानुसार अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या विविध कार्यालयातील अधिकारी/कर्मचा-यांनी दिनांक १६/०१/२०१८ रोजी काळ्या फिती लावून निषेध नोंदविला. कामबंद आंदोलन करण्यात आलेले नाही.
(२) व (३) फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून पोलीस स्टेशन कदिम, जालना येथे आरोपीविरूध्द गु.र.नं. ०५/१८ कलम ३५४ (अ) (१) (२), ५०९ भा.दं.वि. प्रमाणे गुन्हा दाखल करून सदर आरोपीस अटक करण्यात आली. सीसीटिव्ही फुटेज चे डिव्हीआर तपासणी कामी मा.संचालक, सहाय्यक न्यायवैज्ञानिक प्रयोगशाला, मुंबई येथे तपासणीकरीता पाठविलेला असून सदर तपासणी अहवाल अद्याप अप्राप्त आहे. सदर गुन्ह्यात फिर्यादीस पुर्ण पणे सहकार्य करण्यात आलेले आहे.

सदर गुन्ह्यामध्ये आरोपींविरूध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले आहे. सदरचे प्रकरण सध्या न्यायप्रविष्ठ आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विक्रोळी (मुंबई) हनुमान नगरातील एसआरए योजनेतील**
**भ्रष्टाचाराबाबत केलेले आंदोलन**

**(१७) १०५११० (१२-०४-२०१८) श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रोळीच्या (मुंबई) हनुमान नगरातील एसआरए योजनेतील सुरु असलेला घोटाळा व भ्रष्टाचाराबाबत नवजीवन सोसायटी हनुमान मंदिर या ठिकाणच्या मोकळ्या जागेत दिनांक १३ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारासापासून शेकडो झोपडीधारकांकडून सुरु असलेले आंदोलन, या आंदोलनाचा भाग म्हणून दिनांक २९ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास अन्न त्याग सत्याग्रह करण्याचा निर्णय घेतला असताना, पोलीसांनी बळाचा वापर करुन आंदोलन करणाऱ्या महिला व रहिवाशांची धरपकड करुन आंदोलन दडपून टाकले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, आंदोलकांच्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्या पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-११-२०१८) :** (१) नाही, हे खरे नाही. परंतू पार्कसाईट पोलीस ठाणेचे हद्दीत हनुमान नगर, पार्कसाईट, विक्रोळी (प.), मुंबई येथे एस.आर.ए. योजनेत सुरु असलेला घोटाळा व भ्रष्टाचाराच्या विरोधात तेथील समर्थकांनी दि.२६.१२.२०१७ ते २९.१२.२०१७ या कालावधीत अन्नत्याग व साखळी उपोषणासाठी एकत्र जमून मा.पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या जमावबंदीचे आदेश तसेच वरिष्ठ पो.निरिक्षक, पार्कसाईट पोलीस ठाणे, मुंबई यांनी वेळोवेळी बजावलेल्या आदेशाचे उल्लंघन केले तसेच सदर इसमांना तेथून निघून जाण्याबाबत समज दिली असता त्यांनी घोषणाबाजी व सत्याग्रह चालूच ठेवल्याने त्यांना कार्यवाहीकरिता ताब्यात घेतले असता त्यांनी फिर्यादी व पोलीसांना धक्काबुक्की व मारहाण करुन जखमी करुन शिविगाळ केली व पोलीसांच्या कामात अडथळा निर्माण केला म्हणून त्यांच्याविरुध्द पार्कसाईट पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.५३५/२०१७ कलम ३३२, ३५३, १४३, १४७, १४९, १८६, १८८ भादंविसह कलम ३७(३) १३५ मपोका प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.
(२) व (३) पार्कसाईट पोलीस ठाणेचे हद्दीत हनुमान नगर, पार्कसाईट, विक्रोळी (प.), मुंबई येथील लोकांच्या तेथील एस.आर.ए. योजनेत विकासकांनी केलेला घोटाळा व भ्रष्टाचाराच्या अनुषंगाने त्यांच्या तक्रारी होत्या. पोलीसांसमोर बेकायदेशीर जमाव एकत्र येवुन सरकारी कामात अडथळा आणून फिर्यादी पोलीस व बंदोबस्तावरील इतर पोलीसांना मारहाण केल्याप्रकरणी त्यांच्याविरुध्द सदरचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे. याबाबतचा पुढील तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चित्रपटगृहात बाहेरील खाद्यपदार्थ खाण्यास असलेली बंदी उठविण्याबाबत

**(१८) १०५३५२ (०५-०४-२०१८) श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील चित्रपट गृहात बाहेरील खाद्यपदार्थ नेण्यास चित्रपट प्रशासनाने घातलेली बंदी मा.मुंबई उच्च न्यायालयाने उठवूनही चित्रपटगृह प्रशासनाकडून सुरक्षेचे कारण देऊन मा.न्यायालयाचे आदेश धुडकावण्यात आल्याने त्या विरोधात मा.मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिकेवर दिनांक ४ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.मुंबई उच्च न्यायालयाने पुन्हा निर्णय देऊन बाहेरील खाद्यपदार्थ खाण्यास असलेली बंदी उठवून याबाबत येत्या तीन आठवड्यात नियमावली तयार करावेत असे आदेश राज्य शासनाला दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चित्रपटगृहांमध्ये प्रेक्षकांना बाहेरचे किंवा स्वतःचे खाद्यपदार्थ नेण्यास मज्जाव करण्याबाबतचा निर्णय चित्रपटगृहांच्या मालकानी माहे जाने, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान घेतला असून सदर निर्णयानुसार मुंबईसह अन्य शहरांतील मल्टिप्लेक्स व अन्य चित्रपटगृहांमध्ये स्वतःचे खाद्यपदार्थ सोबत नेण्यास मज्जाव केला जातो आहे, यामुळे घटनेतील अनुच्छेद २१ अन्वये असलेल्या जगण्याच्या हक्काचे उल्लंघन करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र सिनेमा (नियामक) नियमावली १९६६ मधील नियम १२१ अन्वये चित्रपटगृहांत खाद्यपदार्थाच्या विक्रीला मनाई असतांनाही आधुनिक पध्दतीच्या
चित्रपटगृहांमध्ये प्रेक्षकांना आतच असे खाद्यपदार्थाची विक्री करुन नियमाचे उघडपणे उल्लंघन केले जाते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार चित्रपट गृहात बाहेरील खाद्यपदार्थ आणून खाण्यास असलेली बंदी उठविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-१२-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) यासंदर्भात श्री.जैनेंद्र बक्षी यांनी जनहित याचिका क्र.८२/२०१७ मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केली असून, सदर प्रकरण सद्यस्थितीत न्यायप्रविष्ट आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबई शहर व उपनगरातील रहदारीच्या रस्त्यावरील सी.सी.टि.व्ही. कॅमे-यांचे नियंत्रण करण्यासाठी नियंत्रण कक्षाकरिता पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदे भरण्याबाबत

**(१९) १०६२२६ (११-०४-२०१८) श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व उपनगरातील रहदारीच्या वर्दळीच्या रस्त्यावर सी.सी.टि.व्ही. कॅमेरे बसविण्यासाठी मे.लार्सन ॲन्ड टुब्रो च्या कंपनीशी दिनांक ७ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा

त्यासुमारास करार करण्यात आला व त्यानुसार मुंबई शहरात ४७१७ सी.सी.टि.व्ही कॅमेरे बसविण्यात आले सदरच्या कॅमे-यांचे नियंत्रण करण्यासाठी नियंत्रण कक्षाकरिता पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची एकूण ४२ पदे सुधारीत आकृतीबंधात प्रस्तावित करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील पदे भरण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-१२-२०१८) :** (१) व (२) महाराष्ट्र पोलीस दलातील मुंबई शहर या घटकाच्या सुधारीत आकृतीबंधामध्ये वाहतुक विभाग,मुंबई या कार्यालयाकरिता मापदंडानुसार पदांचा समावेश करण्यात आला आहे. सदर पदामध्ये सीसीटीव्ही कॅमे-याचे नियंत्रण करण्यासाठी आवश्यक पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्या पदांचा समावेश करण्यात आला आहे.

महाराष्ट्र पोलीस दलाचा सुधारीत आकृतीबंध अंतिम करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कोल्हापूर शहरामध्ये जागतिक दर्जाचे छत्रपती शाहू महाराजांचे स्मारक उभारण्याबाबत

**(२०) १०८७२४ (१२-०४-२०१८). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरामध्ये जागतिक दर्जाच्या छत्रपती शाहू महाराजांच्या स्मारकासाठी छत्रपती शाहू मिलची जागा वस्त्रोद्योग महामंडळाकडून शासनाकडे व शासनाकडून कोल्हापूर महानगरपालिकेच्या ताब्यात मिळालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्मारकासाठी कोल्हापूर महानगरपालिका प्रशासनाकडून शासनाकडे आराखडा सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर स्मारकासाठी रु.१६९ कोटी निधीची आवश्यकता असून हा निधी शासनाने देण्याची घोषणा करूनही आजातागात निधीची तरतुद करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, छत्रपती शाहू स्मारकाचे काम प्रलंबित असून याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-१२-२०१८) :** (१) हे खरे आहे

(२), (३) व (४) छत्रपती शाहु महाराजांचे स्मारक उभारण्यासंदर्भात पालकमंत्री, कोल्हापूर यांच्या अध्यक्षतेखाली स्थानिक मंत्री, स्थानिक लोकप्रतिनिधी इत्यादींचा समावेश असलेली समिती दिनांक १२ मार्च,२०१३ अन्वये गठित करण्यात आली असून सदर समितीमार्फत स्मारकाचे स्वरुप, संकल्पना, आराखडे, अंदाजपत्रक व जागा हस्तांतरण तसेच स्मारकाच्या

बांधकामासाठी आवश्यक निधी इ. संदर्भातील  निर्णय घेण्यात येणार आहेत. तथापि, कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री, लोकप्रतिनिधी बदलल्यामुळे समितीच्या पुर्नरचनेबाबतचा प्रस्ताव मा.मुख्यमंत्री कार्यालयास सादर करण्यात आला आहे. समिती पुर्नगठनास मान्यता प्राप्त होताच सदर समितीमार्फत स्मारकाचे आराखडे, जागा हस्तांतरण तसेच स्मरकाच्या बांधकामाच्या आवश्यक निधीबाबतचे निर्णय तातडीने घेण्यात येतील.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मल्हारपेठ (ता.पाटण, जि.सातारा) येथील पोलीस आऊटपोस्टची श्रेणी सुधारूण त्याठिकाणी नवीन पोलीस स्टेशन निर्माण करण्याबाबत**

**(२१) १०८७९० (०७-०४-२०१८) श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाटण (जि.सातारा) विधानसभा मतदारसंघातील कराड-चिपळुण या प्रमुख राष्ट्रीय महामार्गावर असणा-या मल्हारपेठ (ता.पाटण, जि.सातारा) येथील पोलीस आऊटपोस्टची श्रेणी सुधारणा (अपग्रेडेशन) करुन त्याठिकाणी नवीन पोलीस स्टेशन होणेबाबत सन २००१ मध्ये व त्या दरम्यान राज्य शासनाकडे प्रस्ताव देवून मागणी केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरचा प्रस्ताव हा पोलीस महासंचालक यांचेकडे तपासकामी पाठविण्यात आला आहे असे तत्कालीन गृहमंत्री यांनी सन २००७ मध्ये वा त्या दरम्यान सांगितले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरचे मल्हारपेठ येथील पोलीस आऊटपोस्ट हे नव्याने होत असलेल्या प्रमुख राष्ट्रीय महामार्गावर असून त्याचे श्रेणी सुधारणा करून त्याठिकाणी नवीन पोलीस स्टेशन देण्यास मान्यता देणे अत्यंत गरजेचे असल्याने राज्य शासनाने याबाबत कोणता निर्णय घेतला आहे व तद्नुसार कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-१२-२०१८) :** (१), (२) व (३) मल्हारपेठ (ता.पाटण,जि.सातारा) येथील पोलीस आऊटपोस्टची श्रेणी सुधारणा (अपग्रेडेशन) करुन त्याठिकाणी नवीन पोलीस स्टेशन होणेबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाला असून सदर प्रस्ताव तपासण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईसह राज्यातील, अनेक चित्रपटगृह मालकांनी, प्राईमटाइम मध्ये मराठी चित्रपट प्रदर्शित करण्यास नकार दिल्याबाबत**

**(२२) १०९६३६ (०५-०४-२०१८) श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यातील, बहुसंख्यीय चित्रपटगृह मालकांनी, 'देवा' सह अनेक मराठी चित्रपटांना प्राईमटाइम मध्ये, चित्रपट प्रदर्शित करण्यास नकार दिल्याचे, माहे डिसेंबर २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गत काही वर्षात, मोठ्या संख्येने मराठीमध्ये चांगल्या सिनेमांची निर्मिती होवूनही ती लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी, प्राईमटाइममध्ये चित्रपटगृह उपलब्ध होत नसल्याने, मराठी चित्रपटांची गळचेपी व कुचंबना होत असल्याचा प्रकार, सातत्याने होत असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मराठी भाषा आणि संस्कृती, साहित्य, नाटक, चित्रपट यांची जोपासना करण्याच्या दृष्टीने, प्राईमटाइममध्ये सक्तीने एक शो मराठी चित्रपटांना उपलब्ध करुन देणे बंधनकारक करणेबाबत, अद्याप शासनातर्फे कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) तसेच, शासन निर्णयानुसार, प्राईमटाइममध्ये एक शो मराठी चित्रपट प्रदर्शित न करणा-या, चित्रपट गृह मालकाविरुध्द, शासनाने कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-१२-२०१८) :** (१) खरे नाही.
(२) खरे नाही.
(३) व (४) चित्रपटगृहांना परवाना देताना वर्षातून चार आठवडे मराठी चित्रपट प्रदर्शित करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. प्राईमटाईम मध्ये एक शो मराठी चित्रपट प्रदर्शित करण्यात येत नसल्याबाबत तक्रार प्राप्त झालेली नाही.

यापुढे चित्रपटगृह परवाना नुतनीकरण करताना सदर चित्रपटगृहात वर्षातील चार आवठडे मराठी चित्रपट प्रदर्शित करण्यात आला आहे अथवा नाही याबाबत परवाना प्राधिकाऱ्यांना तपासणी करण्याची सूचना देण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबईत राहणा-या निवृत्त आयकर आयुक्तांचे सातारा परिसरातील दोन मोठे भूखंड परस्पर विक्री करुन फसवणूक करण्यात आल्याचे प्रकरण

**(२३) ११२४१३ (१२-०४-२०१८) श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईत राहणा-या निवृत्त आयकर आयुक्तांचे सातारा परिसरातील दोन मोठे भूखंड बनावट जीपीएद्वारे परस्पर रुपये ३० लाखांत विक्री करणा-या रॅकेटमधील आरोपींना गुन्हे शाखेने नुकतेच माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान अटक केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार संबंधीत दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

वि.स. ५२१ (२०)

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-१२-२०१८) :** (१) व (२) मुंबईत राहणा-या निवृत्त आयकर अधिकारी यांचे मौजे. सातारा ता. जि. औरंगाबाद येथील गट क्र. २५ मधील प्लॉट क्र.१ व २ हे दोन भूखंड बनावट मुखत्यारनामा तयार करून त्या आधारे सातारा गट क्र. २५ मधील फिर्यादी यांचे प्लॉट क्र.२९ व ३२ हे प्लॉट क्र.१ व २ आहेत असे भासवून परस्पर खरेदी-विक्री करणा-या रॅकेटमधील ६ आरोपींविरुध्द पो. स्टे. सातारा, औरंगाबाद शहर येथे दि.२७/११/२०१७ रोजी गु.र.नं. ५०४/२०१७ भा.दं.वि. कलम ४२०,४६७,४६८,४७१,४४७,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी गुन्ह्याचा तपास करून आरापीतांविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. सद्यस्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
(३) विलंब झालेला नाही.

---

## लांजा व राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील पोलीस ठाण्यांच्या इमारती व पोलीस वसाहतीच्या नुतनीकरणाबाबत

**(२४) ११४७०० (०७-०४-२०१८) श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लांजा व राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील पोलीस ठाण्यांच्या इमारतीची अत्यंत दुरवस्था झालेली असून तालुक्यातील सर्व पोलीस ठाण्यांचे नुतनीकरण करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधिंनी विविध आयुधांद्वारे/संबंधित मंत्री, सचिव आदींकडे पत्रव्यवहार करून शासनाचे लक्ष वेधूनही अद्याप पोलीस ठाण्याच्या इमारतीबाबत कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दोन्ही तालुक्यातील पोलीस ठाण्याच्या इमारतीबरोबर पोलीस वसाहतीदेखील मोडकळीस आलेल्या असून पोलीस कर्मचारी जीव धोक्यात घेऊन वसाहतीमध्ये वास्तव्य करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त वसाहतीमधील अनेक घरांचे छप्पर, दरवाजे, शौचालय आदिंची अत्यंत दुरवस्था झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

व तद्नुसार उपरोक्त तालुक्यातील पोलीस ठाण्याच्या इमारती व पोलीस वसाहतीच्या नुतनीकरणाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-१२-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) लांजा व राजापूर येथील पोलीस वसाहती जुन्या असल्याने मोडकळीस आलेल्या आहेत. तसेच त्यांची वेळोवेळी दुरुस्ती करण्यात आली आहे.

(४) लांजा व राजापूर पोलीस ठाण्याची प्रशासकीय इमारत व पोलीस अधिकारी व कर्मचा-यांकरिता शासकीय निवासस्थाने बांधकामाबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, मुंबई यांचेमार्फत हाती घेण्यात आला असून निधी उपलब्धतेनुसार काम हाती घेण्यात येणार आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पानगाव (ता.रेणापूर, जि.लातूर) येथे पोलीस ठाणे मंजूर करण्याबाबत**

**(२५) ११५४५२ (११-०४-२०१८) श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पानगाव (ता.रेणापूर जि.लातूर) येथे पोलीस ठाणे मंजूर करण्याची घोषणा तत्कालीन गृह राज्यमंत्री महोदयांनी सन २०१६ मध्ये लातूर येथे केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुषंगाने जिल्हा पोलीस प्रशासनाने नवीन पोलीस ठाणे मंजुरीचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रस्ताव अद्यापही मंजुरीअभावी प्रलंबित असण्याची व सदर ठिकाणी पोलीस ठाणे कार्यान्वित न करण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, सदर पोलीस ठाणे मंजुरीबाबत व कार्यान्वित करण्याबाबत शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-१२-२०१८) :** (१), (२), (३) व (४) लातुर जिल्हयातील रेणापूर पोलीस ठाणे अंतर्गत मौजे पानगांव येथे दुरक्षेत्र असून रेणापूर पोलीस ठाण्याचे विभाजन करून नवीन पानगाव पोलीस ठाणे निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाला असून सदर प्रस्तावाबाबत पोलीस महासंचालक कार्यालयाकडून अधिक माहिती मागविण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पोलीस उपनिरीक्षक पदासाठी सन २०१३ मध्ये अहर्ता परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या अंमलदारांना पोलीस उप निरीक्षक पदी पदोन्नती मिळण्याबाबत**

**(२६) ११६८७७ (२५-०७-२०१८) श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पोलीस उप निरीक्षक पदासाठन २०१३ मध्ये अहर्ता परीक्षा घेण्यात आली असून सदर परीक्षेत सुमारे ८००० अंमलदार अहर्ता प्राप्त होवून उत्तीर्ण झाले असतानाही त्यापैकी केवळ २००० अंमलदारानाच अद्यापपर्यंत पोलीस उप निरीक्षक पदी पदोन्नती देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने पदोन्नती देताना सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नती न दिल्याने ज्येष्ठ अंमलदारांवर अन्याय झाल्याची भावना निर्माण झाल्या कारणाने काही अंमलदारांनी न्यायालयात धाव घेतली असता न्यायालयाने नमूद प्रकरणात अंतिम निर्णय होईपर्यंत पदोन्नतीस स्थगिती दिली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दरम्यानच्या काळात शासनाने पोलीस उप निरीक्षक पदे व्यपगत होवू नये, याकरिता न्यायालयाच्या आदेशाच्या अधीन राहून सन २०१३ मध्ये परीक्षेत अर्हता प्राप्त होवून उत्तीर्ण झालेल्या अंमलदारांऐवजी परीक्षेस न बसलेल्या १९०० अंमलदारांना तात्पुरती पदोन्नती दिल्याने परीक्षेस बसून अर्हता प्राप्त झालेल्या अंमलदारांवर मोठा अन्याय करण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत न्यायालयात प्रलंबित असलेल्या विविध याचिकांच्या सुनावणी दरम्यान पोलीस महासंचालक कार्यालयाने सन २०१३ मध्ये अर्हता परीक्षा उत्तीर्ण झालेल्या सर्व अंमलदारांना टप्प्याटप्प्याने पदोन्नती देण्यात येत असल्याचे स्पष्ट केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सन २०१३ मध्ये घेण्यात आलेली परीक्षा ही स्पर्धा परीक्षा नसून अर्हता परीक्षा असल्याने या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या अंमलदारांना पदोन्नती मिळणे क्रमप्राप्त असल्याचे मॅट कोर्टाने नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सन २०१३ मधील अर्हता परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या अंमलदारांवर होत असलेला अन्याय दूर करण्यासाठी त्यांना न्यायालयीन आदेशाच्या अधीन राहून पोलीस उप निरीक्षक पदी पदोन्नती देण्याबाबत शासनाकडून अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-११-२०१८) :** (१) विभागीय अर्हता परीक्षा सन २०१३ करीता एकुण २८,११४ कर्मचाऱ्यांनी त्यांची पात्रता आजमाविली असून एकूण १९,३८४ कर्मचारी उत्तीर्ण झाले आहेत. सदर कर्मचाऱ्यांमधून त्यांच्या पोलीस शिपाई पदावरील भरती दिनांकाच्या सेवाजेष्ठतेनुसार/प्रवर्गनिहाय दि.३१/१२/२०१६ पर्यंत रिक्त झालेल्या पदांवर एकूण २४५६ पात्र कर्मचाऱ्यांना पोलीस उप निरीक्षक पदावर पदोन्नती देण्यात आलेली आहे.

(२) होय.

(३) विभागीय अर्हता परीक्षा सन २०१३ मध्ये उत्तीर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांमधून सेवाजेष्ठतेनुसार/प्रवर्गनिहाय २४५६ पात्र कर्मचाऱ्यांना पोलीस उप निरीक्षक पदावर पदोन्नती देण्यात आली असून मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या आदेशानुसार तात्पुरती पदोन्नती देणे बंद करण्यात आले आहे.

(४), (५) व (६) प्रस्तुत विषय न्यायप्रविष्ट आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

___

**राज्यातील ११०० पोलीस ठाण्यामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याच्या निर्णयाबाबत**

**(२७) ११७१०३ (०३-०८-२०१८) अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पोलीस ठाण्यात होणा-या कोठडीतील मृत्यू तसेच इतर गैरप्रकारांना प्रतिबंधीत करण्यासाठी मुंबई पाठोपाठ राज्यातील १,१०० पोलीस ठाण्यात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा निर्णय शासनाने माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याकरिता शासनाला किती खर्च येणार आहे व दिनांक ३१ मे, २०१८ अखेर पर्यंत किती पोलीस स्टेशनमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत,

(३) तसेच सदरहू पोलीस स्टेशनमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-१२-२०१८) :** (१) होय.

(२) व (३) राज्यातील ११०० पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी रु.७२.६० कोटी एवढ्या खर्चास प्रशासकीय मान्यता दि.२६.०३.२०१८ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आली आहे. राज्यातील ११०० पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची कार्यवाही माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या अंतर्गत असलेल्या महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळामार्फत करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई उच्च न्यायालयाच्या नवीन इमारतीच्या बांधकामाबाबत**

**(२८) ११७२६५ (३१-०७-२०१८) श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या इमारतीतील जागा वाढत्या खटल्यामुळे अपुरी पडत असल्याने मा.मुंबई उच्च न्यायालयाने नवीन इमारत बांधण्याबाबत केलेल्या मागणीनुसार शासनाने सन २०१६ मध्ये वांद्रे, मुंबई उपनगर येथील भूखंड न्यायालयाची नवीन इमारत बांधण्यासाठी दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भूखंडावर नवीन इमारत बांधण्याचे काम अद्याप सुरु न झाल्याने मा.मुंबई उच्च न्यायालयाने याबाबत शासनास दोष दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर भूखंडावर इमारत बांधकाम करण्यास अद्यापही सुरुवात न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करून सदर भूखंडावर इमारत बांधणीच्या कामास सुरुवात करून तातडीने काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-११-२०१८) :** (१) मुंबई उच्च न्यायालयाच्या प्रस्तावित न्यायालयीन संकुलाचा समावेश वांद्रे शासकीय वसाहत पुनर्विकास आराखड्यात करण्यास शासनाने तत्वत: मान्यता दिली आहे.
(२) हे खरे नाही. प्रस्तावित ठिकाणी असलेल्या शासकीय वसाहतीतील रहीवाश्यांचे अन्यत्र पुनर्वसन होऊन भुखंड मोकळा झाल्यावर मुंबई उच्च न्यायालयाच्या संकुलाचे काम हाती घेता येईल.
(३) व (४) सदर ठिकाणी मोकळा भुखंड उपलब्ध नाही. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत तेथे अस्तित्वात असलेल्या शासकीय वसाहतीतील रहीवाश्यांचे पुनर्वसनाकरीता अन्य ठिकाणी पर्यायी निवास व्यवस्था करण्यासाठी रु.२९६.१२ कोटी किंमतीच्या कामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. हे काम पुर्ण झाल्यावर उच्च न्यायालयाच्या संकुलाचे ठिकाणी असलेल्या इमारतीचे पाडकाम सुरु करण्यात येऊन भुखंड मोकळा करण्यात येऊन संकुलाचे बांधकाम हाती घेण्यात येऊ शकेल. या संदर्भात जनहीत याचिकाही न्यायप्रविष्ट आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात नवीन पोलीस आयुक्तालये स्थापन करण्याबाबत

**(२९) ११८५२३ (२५-०७-२०१८) श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात नवीन पोलीस आयुक्तालये स्थापन करण्याचा शासनाचा विचार असुन कोल्हापूर, पिंपरी-चिंचवड, मिरा-भाईंदर (जि.ठाणे) व अकोला या ठिकाणी पोलीस आयुक्तालय स्थापन करण्याचा निर्णय माहे मार्च, २०१७ मध्ये घेण्यात आला पंरतू अद्याप पोलीस आयुक्तालय स्थापन करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,
(२) तसेच, नांदेड येथे पोलीस आयुक्तालय सुरु करुन नागरिकांना योग्य वेळी न्याय, सहकार्य मिळावे याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधी वारवांर शासनदरबारी पाठपुरावा करीत असुनही याबाबत शासन दखल घेत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त सर्व ठिकाणी पोलीस आयुक्तालय सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-१२-२०१८) :** (१), (२) व (३) पोलीस आयुक्त,पुणे शहर व पोलीस अधीक्षक, पुणे (ग्रामीण) यांच्या कार्यक्षेत्राचे विभाजन करून दि.२८.०५.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय निर्माण करण्यात आले असून सदर आयुक्तालयाचे कामकाज दि.१५.०८.२०१८ पासून सुरू करण्यात आले आहे.

कोल्हापूर, मिरा-भाईंदर व अकोला या ठिकाणी पोलीस आयुक्तालय स्थापन करण्याबाबतचे प्रस्ताव प्राप्त झाले असून सदर प्रस्तावावर वित्त विभागाने उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने पूर्तता करण्याची कार्यवाही सुरू आहे.

नांदेड येथे पोलीस आयुक्तालय स्थापन करणे बाबतचा प्रस्ताव पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयाकडून शासनाकडे अद्याप प्राप्त झालेला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रेडी (जि.सिंधुदूर्ग) येथील समुद्रात बुडालेल्या बार्जमुळे केरवाडा परिसरातील मच्छिमारांचे झालेले नुकसान

**(३०) ११८८३१ (३१-०७-२०१८) श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रेडी (जि.सिंधुदूर्ग) येथील समुद्रात माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान बुडालेला बार्ज पाण्याबाहेर न काढल्यामुळे केरवाडा परिसरातील मच्छिमारांचे २३ लाख रुपयांचे नुकसान झाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मच्छिमार बांधवांनी झालेल्या नुकसानीची भरपाई मिळण्यासाठी रेडी बंदराचे संबंधित अधिकारी, बार्जचे ठेकेदार व मेरीटाईम बोर्ड यांच्याकडे विनंती अर्ज केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मच्छिमार बांधवांना नुकसान भरपाई देण्यासह बार्ज पाण्याबाहेर काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-११-२०१८) :** (१) व (२) होय.
(३) स्थानिक मच्छिमार बांधवांकडून प्राप्त निवेदने त्वरीत कार्यवाहीसाठी रेडी पोर्ट लि. यांना पाठविण्यात आली आहेत. तसेच, स्थानिक मच्छिमार बांधवांसोबत महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांच्याकडे दिनांक ३.११.२०१७ रोजी बैठक आयोजित करुन कंपनी स्तरावर मच्छिमार बांधवांनी मागणी केल्याप्रमाणे नुकसान भरपाई देण्यासाठी त्वरीत निर्णय घेण्याबाबत कंपनीस कळविण्यात आले आहे.

बार्ज त्वरीत काढण्याबाबत रेडी पोर्ट लि. यांनी दिनांक १९.९.२०१८ अन्वये तेंडोलकर शिपिंग ॲण्ड लॉजिस्टीक व देसा ओर कॅरिअर्स यांना कायदेशीर नोटीस दिलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिखलोली (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) येथे दिवाणी न्यायालयाची इमारत बांधण्याबाबत**

**(३१) ११९२५४ (२३-०७-२०१८). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिखलोली (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) येथे दिवाणी न्यायालयाची इमारत बांधण्याचा प्रस्तावास माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान राज्य शासनाने मान्यता दिली असून सदर प्रस्तावाच्या अंदाजपत्रकास देखील मान्यता देण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर न्यायालयास मंजुरी मिळून दोन महिन्यांचा कालावधी उलटूनही अद्यापपर्यंत सार्वजनिक बांधकाम विभागाने न्यायालयीन इमारत बांधण्याच्या दृष्टीने कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर न्यायालयीन इमारत बांधकामाबाबत शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-११-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

मौजे चिखलोली, ता.अंबरनाथ, जि.ठाणे येथे दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) या न्यायालयाची इमारत बांधण्याकरीता विधि व न्याय विभाग, शासन निर्णय क्रमांक सीसीबी-१११७/प्र.क्र.१५६/का-१३, दिनांक ८ फेब्रुवारी २०१८ अन्वये रु.१९००.८० लक्ष इतक्या किमतीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर प्रशासकीय मान्यता देतांना कामाच्या ढोबळ अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आलेली आहे.
(२) हे खरे नाही.

सदर कामास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर, पुढील प्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

सदर कामाचे सविस्तर नकाशे व आराखडे मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, महाराष्ट्र राज्य यांच्याकडून दिनांक ८ मे २०१८ रोजी प्राप्त झाले आहेत, त्यास प्रमुख जिल्हा व सत्र

न्यायाधीश, जि.ठाणे यांनी दिनांक ६ जुलै २०१८ रोजी मान्यता दिली आहे. तद्नंतर अधिक्षक अभियंता, संकल्पचित्र मंडळ, कोकण भवन, नवी मुंबई यांचेकडून इमारतीच्या संकल्पनास दिनांक २ ऑगस्ट २०१८ रोजी मान्यता मिळालेली आहे.
(३) सद्य:स्थितीत सदर इमारतीच्या कामाचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता प्राप्त झालेली आहे. सध्या या कामाची निविदा सूचना प्रसिध्द करण्यात आली
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात पोलीस प्रशासनाकडे असलेल्या अपुऱ्या मनुष्यबळामुळे गुन्हेगारीत वाढ होत असल्याबाबत

**(३२) ११९३२९ (२५-०७-२०१८). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्ह्यासह राज्यातील वाढत्या गुन्हेगारीसाठी पोलीस प्रशासनाकडे असलेले अपुरे मनुष्यबळ कारणीभूत ठरत असून त्यादृष्टीने शासनाने राज्यात पोलीस भरतीचे १२ हजार पदे भरण्याचे आश्वासन दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बुलढाणा जिल्ह्यातील बेरोजगार तरुणांची पोलीस भरती करुन प्रत्येक जिल्ह्यात किमान २०० पदे भरावीत या मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर माहे फेब्रुवारी २०१८ मध्ये वा त्यादरम्यान आंदोलन केले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वाढत्या गुन्हेगारीला प्रतिबंधीत करण्यासाठी शासनाने प्रत्येक जिल्ह्यासाठी पोलीसांची किमान २०० पदे भरण्याबाबत कोणती आवश्यक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-१२-२०१८) :** (१) गुन्हयामध्ये होणारी वाढ नैसर्गिक असून त्यासाठी अपुरे मनुष्यबळ कारणीभूत ठरत आहे हे खरे नाही.
राज्यातील सर्व पोलीस घटक प्रमुखांच्या आस्थापनेवर दि.३१/१२/२०१८ अखेर पर्यंत पोलीस शिपाई सवंर्गात रिक्त होणारी ५९७९ पदे भरण्यास शासनाने दि.०५/०२/२०१८ रोजी मान्यता दिली असून त्यानुसार सर्व पोलीस घटकांनी सदरहू रिक्त पोलीस शिपायांची पदे भरण्यासाठी भरती प्रक्रिया पूर्ण केली आहे.
(२) होय,
(३) व (४) राज्यातील सर्व पोलीस घटक प्रमुखांच्या आस्थापनेवर दि.३१/१२/२०१८ अखेर पर्यंत पोलीस शिपाई सवंर्गात रिक्त होणारी ५९७९ पदे भरण्यास शासनाने दि.०५/०२/२०१८ रोजी मान्यता दिली असून त्यानुसार सर्व पोलीस घटकांनी सदरहू रिक्त पोलीस शिपायांची पदे भरण्यासाठी भरती प्रक्रिया पूर्ण केली आहे.

---

**संघटीत व असंघटीत कामगार क्षेत्रातील कामगारांनी मुंबई येथील आझाद मैदानात शासनाच्या कामगार विरोधी धोरणाविरुध्द केलेल्या आंदोलनाबाबत**

**(३३) ११९९९७ (२३-०७-२०१८) श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंतरराष्ट्रीय कामगार दिनाचे औचित्य साधत संघटीत व असंघटीत कामगार क्षेत्रातील हजारो कामगारांनी दिनांक १ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास मुंबई येथील आझाद मैदानात शासनाच्या कामगार विरोधी धोरणाविरुध्द मोठ्या प्रमाणात आंदोलन केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामगारांच्या मागण्या काय आहेत, त्याबाबत शासनाने काय निर्णय घेतला आहे व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०७-१२-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) संघटित व असंघटित कामगार क्षेत्रातिल कामगारांच्या एकुण १४ मागण्या असुन त्या खालीलप्रमाणे आहेत.

i) प्रति कामगार दरमहा रू.१८००० किमान वेतन

ii) वाढती महागाई त्वरीत रोखा व सार्वजनिक रेशन व्यवस्था व्यापक व बळकट करा.

iii) कंत्राटी पद्धत बंद करा व समान कामाला समान वेतन द्या.

iv) देशात नोक-यांची उपल्बधता वाढवा.

v) सार्वजनिक वाहतुक सेवेचे आधुनिकिकरण करणे.

vi) सर्व कामगार तसेच शेतक-यांना रु.३००० निवृत्त वेतन द्यावे.

vii) बोनस, भविष्यनिर्वाह निधी, ग्रच्युईटी कायद्यातील सिलिंग रद्द करा व ३० दिवसाची ग्रच्युईटी द्या.

viii) सार्वजनिक धंद्याचे खाजगीकरण बंद करा.

ix) सुरक्षा, रेल्वे व आर्थिक केंद्रात परकीय भांडवलाच्या प्रवेश बंद करा.

x) कामगार कायद्यातील प्रस्थापीत कामगार विरोधी बदल रद्द करा.

xi) कामगार संघटना नोंदणी अर्ज दाखल झाल्यापासुन ४५ दिवसात नोंदणी करा.

xii) आयएलओच्या कन्हेंशन ८७ व ९८ रॅटिफिकेशनला मान्यता द्या.

xiii) सर्वांना सामाजिक सुरक्षा द्या

xiv) महाराष्ट्रातील सर्व शेतक-यांची सरसकट कर्ज माफी करा.

निवेदनातील बहुतांशी मागण्या ह्या धोरणांत्मक स्वरूपाच्या असुन त्यातील कंत्राटी कामगार पद्दतीचे निर्मुलन व किमान वेतन निश्चित करणे याबाबत शासन स्तरावरुन नियमीतपणे कार्यवाही करण्यात येते. तसेच कामगार संघटनांची नोंदणी आवश्यक कागदपत्रांसह परीपुर्ण अर्ज झाल्यानंतर प्राप्त ४५ दिवसात नोंदणी करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

___

**औद्योगिक प्रशिक्षण संस्था भुसावळ (जि.जळगाव) येथील विद्यार्थ्यांच्या महाराष्ट्र स्टेट स्किल कॉम्पीटीशन सन २०१८ च्या परिक्षेत झालेल्या गैरकारभाराबाबत**

**(३४) १२०१७४ (३०-०७-२०१८) श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औद्योगिक प्रशिक्षण संस्था भुसावळ (जि.जळगाव) येथील विद्यार्थ्यांच्या महाराष्ट्र स्टेट स्किल कॉम्पीटीशन सन २०१८ च्या परिक्षेत झालेल्या गैरकारभाराची चौकशी करण्याचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १६ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास मा. मंत्री महोदयांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार विद्यार्थ्यांच्या झालेल्या नुकसानास जबाबदार असलेल्या व्यक्तींवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२९-११-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सदर निवेदनाच्या सहसंचालक, प्रादेशिक कार्यालय, नाशिक, प्राचार्य औद्योगिक प्रशिक्षण संस्था भुसावळ जि.जळगांव तसेच कॉन्फडरेशन ऑफ इंडीयन इंडस्ट्रीज, मुंबई यांना चौकशी करुन त्याबाबतचा अहवाल सादर करण्याच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत.

---

**राज्याच्या सागरी सुरक्षेसाठी राज्याच्या अर्थसंकल्पात निधीची तरतूद अत्यल्प प्रमाणात करण्यात आल्याबाबत**

**(३५) १२०२०७ (२६-०७-२०१८) श्री.अजय चौधरी (शिवडी), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या सागरी सुरक्षेसाठी अर्थसंकल्पात निधीची तरतूद अत्यल्प प्रमाणात करण्यात आल्यामुळे सागरी सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सागरी सुरक्षेसाठी नेमलेल्या सुरक्षा रक्षक व पर्यवेक्षकांच्या मानधनासाठी रुपये ४ कोटी ५३ लाख आणि गस्तीनौकांच्या भाड्यापोटी रुपये १ कोटी ३५ लाखांची मागणी अर्थ विभागाकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईसह राज्यातील वाढते दहशतवादी हल्ले लक्षात घेता सागरी सुरक्षा सक्षम करण्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने काय निर्णय घेतला व तद्नुसार अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) सन २०१८-१९ मध्ये सागरी सुरक्षेसाठी सुरक्षा रक्षक व पर्यवेक्षक यांचे वेतन व मानधन अदा करणेस्तव मत्स्यव्यवसाय विभागाने रु.३६८.४२ लक्ष इतका निधी पुरवणी मागणीव्दारे मंजूर करुन घेतला आहे. तसेच गस्तीनौकाच्या भाडेपोटी प्रतिवर्ष रु.६.८० कोटी असे ५ वर्षाकरिता रु.३४ कोटीचा खर्च पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे असलेल्या उपलब्ध तरतुदीमधून हा खर्च भागविण्यात येणार आहे.

(३) सागरी सुरक्षा सक्षम करण्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने राज्यात सागरी सुरक्षेकरिता स्वतंत्र लेखाशिर्ष निर्माण करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दासखेड, (ता.केज, जि.बीड) येथील भोंदूबाबाने एका युवतीवर कलेला अत्याचार

**(३६) १२०७४३ (३०-०७-२०१८) श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दासखेड, (ता.केज, जि.बीड) येथील विजय साधुजीराव वीर या भोंदूबाबाने उसतोड कामगाराच्या २१ वर्षीय मुलीवर गत ६ वर्षापासून अत्याचार केल्याची तक्रार पिडीत मुलीच्या आई-वडिलांनी बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात दिनांक १७ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास नोंदविली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार आरोपींना अटक करून त्यांच्याविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-११-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

नमूद गुन्ह्यातील सदर आरोपी कर्झणी, ता. जि. बीड येथे राहत असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

(२) फिर्यादीने दिलेल्या तक्रारीनुसार बीड ग्रामीण पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. १२८/२०१८ कलम ३७६ (२), (i) (n), ३०७ ३२३, ५०६, ३४ भा.द.वि. व कलम ३, ४ बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा सन २०१२ प्रमाणे ०३ आरोपीतांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपी क्र. १ हा फरार असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत. आरोपी क्र. २ हिला अटक करण्यात आली असून सध्या मा.न्यायालयाच्या आदेशान्वये जामिनावर मुक्त केले आहे. आरोपी क्र.३ यांना मा.दुसरे सत्र न्यायालय बीड यांचे आदेशान्वये अटकपुर्व जामीन मंजूर झाला आहे. सद्यस्थितीत नमुद आरोपातांविरूध्द पुरावा गोळा करून मा.न्यायालयात दोषारोप पत्र सादर करणेवर गुन्हा तपासावर प्रलंबित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाण्यासह मुंबई शहर, उपनगर येथील सर्वच पोलीस वसाहतींच्या इमारतींची झालेली दूरवस्था

**(३७) १२०७७६ (३०-०७-२०१८) श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाण्यासह मुंबई शहर, उपनगर येथील सर्वच पोलीस वसाहतींच्या इमारतींची दूरवस्था झाल्यामुळे यामध्ये राहणा-या पोलीसांच्या कुटुंबांना धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन पोलीस वसाहतीतील इमारतींच्या दुरुस्तीबाबत वा पुनर्विकास करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) मुंबई शहर व उपनगरातील पोलीस वसाहतीतील इमारतींच्या दुरुस्तीसाठी सन २०१६-१७ या वित्तीय वर्षात □५५.२० कोटी व २०१७-१८ या वित्तीय वर्षात □१६१.७६ कोटी इतका निधी वितरित करण्यात आला आहे.

ठाणे जिल्ह्यातील पोलीस वसाहतीतील इमारतींच्या दुरुस्तीसाठी सन २०१६-१७ या वित्तीय वर्षात रु.२.१४ कोटी व २०१७-१८ या वित्तीय वर्षात □१४.०६ कोटी इतका निधी वितरित करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रंधाफॉल (ता.अकोले, जि.अहमदनगर) येथे पोलीस चौकी निर्माण करणेबाबत

**(३८) १२०९२२ (२५-०७-२०१८) श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रंधाफॉल (ता.अकोले, जि.अहमदनगर) येथे पोलीस चौकी निर्मितीची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा प्रस्ताव पोलीस अधिक्षक यांनी शासनाकडे सादर केला आहे काय,

(३) असल्यास, उक्त पोलीस चौकी निर्माण करणेबाबत शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-१२-२०१८) :** (१) होय.
(२) व (३) याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त नाही.

राजुर पोलीस स्टेशन ते रंधाफॉल अंतर १० कि.मी. व रंधाफॉल ते शेंडी (भंडारदरा) दुरक्षेत्र १० कि.मी.अंतर आहे. राजुर पोलीस स्टेशन व शेंडी आऊट पोस्ट दरम्यान रंधाफॉल येत असल्याने त्या ठिकाणी काही घटना घडल्यास किंवा सुट्टीच्या दिवशी पर्यटकांची गर्दी होत असल्याने योग्य तो पोलीस बंदोबस्त नेमण्यात येतो.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### रत्नागिरी जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण पथक,व्यवस्थापकाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने अटक केल्याबाबत

**(३९) १२३३९२ (२६-०७-२०१८) श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण पथक, रत्नागिरीचा जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक श्री. सचिन रमेश पवार याला रुपये २५ हजारांची लाच स्वीकारताना रत्नागिरी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान अटक केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले व तद्नुसार शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-११-२०१८) :** (१) होय, आरोपी लोकसेवक श्री. सचिन पवार जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक रत्नागिरी याने श्री.हेमंत कृष्णा धुरी यांच्याकडे ६० हजार रुपयाची लाचेची मागणी करून त्यापैकी २५,००० हजार स्विकारतांना त्यांना दिनांक ०९.०५.२०१८ रोजी रंगेहाथ पकडण्यात आले. त्यानुसार त्यांच्या विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमातील विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.
(२) व (३) आरोपी लोकसेवक यांच्या कंत्राटी पदाच्या सेवा दिनांक १०.०५.२०१८ पासून कायमस्वरुप समाप्त केल्या असून दिनांक १४.०८.२०१८ रोजी मा.विशेष न्यायालयात दोषारोप पत्र दाखल खटला क्र ७/२०१८ असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

---

### उमरगा (जि.उस्मानाबाद) पोलीस ठाणे येथील रिक्त पदांबाबत

**(४०) १२३५०५ (२६-०७-२०१८) श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उमरगा (जि.उस्मानाबाद) येथील पोलीस ठाण्यात पोलीसांच्या मंजूर असलेल्या १०४ पदांपैकी २७ पदे सध्या रिक्त असून केवळ ७७ पोलीस रुजू आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ठाण्याच्या हद्दीत उमरगा शहरासह ७३ गावे असल्याने रिक्त पदांमुळे पोलीस यंत्रणेवर ताण येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरची रिक्त पदे भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-११-२०१८) :** (१) व (२) हे खरे आहे.

उमरगा पोलीस स्टेशन हद्दीत ७३ गावे असून, तेथील कायदा व सुव्यवस्था व इतर बंदोबस्ताकरिता उमरगा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी यांच्याकडून जेव्हा जेव्हा मागणी केली जाते, तेव्हा नजिकच्या पोलीस स्टेशनकडून व पोलीस मुख्यालय उस्मानाबाद येथून बंदोबस्ताकरिता व इतर कामाकरिता पोलीस मनुष्यबळ पुरविण्यात येते.
(३) सन २०१७ मध्ये भरती होवून प्रशिक्षण पूर्ण करुन पोलीस मुख्यालय, उस्मानाबाद येथे हजर झालेल्या उमेदवारांमधून सदरची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उदगीर (जि.लातूर) तालुका येथे अतिरीक्त पोलीस अधिक्षक कार्यालयाच्या मंजुरीच्या प्रस्तावाबाबत**

**(४१) १२३६५३ (२६-०७-२०१८) डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उदगीर (जि.लातूर) तालुका वांरवार अतिसंवेदनशील होत असल्याने अतिरीक्त पोलीस अधिक्षक कार्यालय मंजुरीचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असल्याचे माहे मे, २०१८ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अतिरीक्त पोलीस अधिक्षक कार्यालयाची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी व जनतेतून सतत होत असल्याने शासनाने अतिरीक्त पोलीस अधिक्षक कार्यालयाची निर्मिती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-१२-२०१८) :** (१) व (२) पोलीस अधीक्षक,लातूर अंतर्गत उप विभाग उदगीर करिता अपर पोलीस अधीक्षक दर्जाचे पद निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास अद्याप प्राप्त नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भूकंपग्रस्त कारला व कुमठा (ता.औसा, जि.लातूर)**
**गावाचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(४२) १२४०५७ (२६-०७-२०१८) श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **भूकंप पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यातील सन २००७ मध्ये झालेल्या भूकंपात कारला व कुमठा (ता.) येथील घरे मोठ्या प्रमाणावर पडली व अनेक घरे राहण्यालायक राहिली नसल्याने सदर गावांतील घरांचे बांधकाम करून पुनर्वसन करण्याबाबत चा प्रस्ताव जिल्हाधिकारी लातूर यांनी सन २०१८ मध्ये शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावातील किती घरांचे बांधकाम प्रस्तावित केले आहे, त्यासाठी किती खर्च अपेक्षित आहे,

(३) असल्यास सदर प्रस्तावास शासनाने मंजुरी देण्याबाबत व निधी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (३०-११-२०१८) :** (१) नाही. जिल्हाधिकारी,लातुर यांचेकडून दि. ११.०९.२००७ रोजीच्या पत्रान्वये कार्ला व कुमठा येथील एकूण ७३३ घरांना भुकंपामुळे भेगा पडल्याने जुन्या घरांमध्ये राहणा-या ७३३ कुटुंबांचे पुनर्वसनाचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे.

(२) मौ. कार्ला येथे ६८८ व मौ.कुमठा येथे ४५ अशा एकूण ७३३ घरांचे बांधकाम प्रस्तावित असून त्यांसाठी सन २०१६ च्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसूचीनुसार रू. ३२९८.५० लक्ष खर्च अपेक्षीत आहे.

(३) सदर प्रस्तावास शासनाने मंजुरी दिलेली नाही. वित्त विभागाने उपस्थित केलेल्या प्रस्तावातील विसंगत मुद्दयांवर मुद्दयांना अनुसरून जिल्हाधिकारी लातुर यांचेकडून अतिरिक्त माहिती मागविण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील भायखळा कारागृहातून एका कैद्याने केलेले पलायन**

**(४३) १२४७०२ (३०-०७-२०१८) श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील भायखळा कारागृहातील एका न्यायबंदी आरोपीने पोलीस असल्याचे भासवत सदर कारागृहाचे सुरक्षा कवच तोडून पळ काढल्याचे दिनांक ८ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेमुळे भायखळा कारागृहाच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे पुन्हा अशा घटना घडू नयेत याकरिता शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

वि.स. ५२१ (३५)

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-१२-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

भायखळा जिल्हा कारागृहातील कोणत्याही बंद्यांने पोलीस असल्याचे भासवून पलायन केलेले नाही. तथापि, दि.०५.०५.२०१८ रोजी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून कारागृहांच्या प्रशासकीय इमारत दुरुस्तीचे काम सुरु असतांना इमारतीलगत उभे करण्यात आलेल्या बांबूवर चढून न्यायाधिन बंदी आसिफ माजीद शेख याने पलायन केलेले होते. सदर बंद्यास पुन्हा अटक करुन तळोजा मध्यवर्ती कारागृह येथे वर्ग करण्यात आले आहे.

(२) या घटनेची चौकशी करुन एक अधिकारी व चार कर्मचारी यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. भायखळा जिल्हा कारागृहाचे उपलब्ध कर्मचारी यांचेकडून तटाची सुरक्षा व्यवस्थेत वाढ करण्यात आली आहे. कारागृहाची सुरक्षा व्यवस्था चोख ठेवणेबाबत कारागृहातील अधिकारी कर्मचारी यांना सक्त सूचना देण्यात आलेल्या आहेत. सी.सी.टि.व्ही. कॅमेराची संख्या वाढविण्यात आली असून, कारागृहाच्या आतमध्ये अधिकारी व कर्मचारी यांच्या संचार फेरीत वाढ करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अधिव्याख्याता, क्षेत्रकाम निर्देशक, कै. नारायण मेघाजी लोखंडे महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था, मुंबई या पदाचे वेतन आहरीत करतांना अधिदान व लेखा कार्यालयाच्या गैरकारभाराबाबत

**(४४) १२५७११ (२०-०७-२०१८) श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अधिव्याख्याता, क्षेत्रकाम निर्देशक, कै. नारायण मेघाजी लोखंडे महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था, मुंबई या पदाचे माहे जानेवारी, २०१५ चे वेतन आहरीत करतांना दिनांक २८ जानेवारी,२०१५ च्या तांत्रिक खंडाबाबत वस्तुस्थिती निदर्शनास का आणून दिली नाही याबाबत संस्थेकडून दिनांक १५ सप्टेंबर, २०१७ रोजीच्या पत्रान्वये खुलासा मागविण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,अधिव्याख्याता, क्षेत्रकाम निर्देशक, कै.नारायण मेघाजी लोखंडे महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था, मुंबई या पदाचे माहे जानेवारी, २०१५ चे वेतन आहरीत करतांना शासन निर्णयान्वये दिनांक २८ जानेवारी, २०१५ चा तांत्रिक खंड विचारात घेऊन वेतननिश्चिती न करता संपूर्ण महिन्याचे वेतन आहरीत करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,शासन निर्णयान्वये दिनांक २८ जानेवारी, २०१५ चा तांत्रिक खंड देण्यात न आल्याने दिनांक २८ जानेवारी, २०१५ रोजी संबंधित कर्मचाऱ्याचे वय ५८ वर्षे ११ महिने ११ दिवस असल्याचे अधिदान व लेखा कार्यालयाने दिनांक १५ सप्टेंबर, २०१७ रोजीच्या पत्रान्वये कळविले म्हणजेच वयाच्या ५८ वर्षानंतर कर्मचारी शासन सेवेत कार्यरत होता हे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, माहे जानेवारी, २०१५ चे वेतन आहरीत करतांना शासन निर्णयान्वये दिनांक २८ जानेवारी, २०१५ चा तांत्रिक खंड विचारात घेऊन वेतननिश्चिती न करता संपूर्ण महिन्याचे वेतन आहरीत करून अधिदान व लेखा कार्यालयाची दिशाभूल करण्यात आली तसेच वयाच्या ५८ वर्षानंतर वेतनापोटी शासनाचे लाखो रुपयांचे नुकसान झालेले असतांना आता सन २०१७ मध्ये तांत्रिक खंड क्षमापित करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार अधिदान व लेखा कार्यालयाच्या गैरकारभाराबाबत संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२६-११-२०१८) :** (१) होय.

तांत्रिक खंडाबाबत वस्तुस्थितीदर्शक माहिती अधिदान व लेखा कार्यालयास सादर केलेली होती. त्याचप्रमाणे त्यांच्या पत्राच्या अनुषंगाने शासनाने तांत्रिक खंड क्षमापित केल्यासंबंधी निर्गमित केलेला शासन निर्णय व शुध्दीपत्रकाची प्रत सुध्दा उपलब्ध करुन देण्यात आली होती.

(२) सदर पदोन्नतीस महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची मान्यता घेण्याची प्रक्रिया सुरु होती. दि.३१/०१/२०१५ च्या शासन निर्णयान्वये एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि.२९/०१/२०१५ पासून पुढे पदोन्नतीच्या पदावरील कर्मचाऱ्याच्या सेवा शासन निर्णयाद्वारे चालू ठेवण्यात आलेल्या आहेत. तसेच शासनाद्वारे दि.२६/०७/२०१७ व दि.०३/११/२०१७ रोजीच्या शासन निर्णय अन्वये दि.२८/०१/२०१५ पासूनचे सर्व तांत्रिक खंड आयोगाच्या मान्यतेनंतर क्षमापित करण्यात आलेले आहेत.

(३) पदोन्नतीचे पद हे अध्यापकीय पद असल्याने सदर पदाचे सेवानिवृत्तीचे वय ६२ वर्षे आहे, त्यास अनुसरुन सदर कर्मचारी पदोन्नतीच्या पदावर ५८ वर्षानंतर विहित नियमांतर्गत शासन सेवेत कार्यरत होते.

(४) अधिव्याख्याता, क्षेत्रकाम निर्देशक या पदोन्नतीच्या पदाचे सेवानिवृत्तीचे वयोमान ६२ वर्षे आहे. त्याचप्रमाणे सदर प्रकरणी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेने सर्व तांत्रिक खंड क्षमापित झालेले असल्याने, कर्मचारी पदोन्नतीच्या पदावर कार्यरत होता व त्याने सदर पदावर प्रत्यक्ष काम केले असल्याने, त्यांना केलेल्या कामाचे वेतन विहित मार्गाने प्रदान करण्यात आलेले आहे.

(५) यामध्ये शासनाचे नुकसान झाले ही वस्तुस्थिती खरी नसल्याने चौकशी अथवा कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ग्रामपंचायत लोणी (ता.आंबेगाव, जि.पुणे) येथील सरपंच यांना जीवे मारण्याचा धमक्या येत असल्याबाबत**

**(४५) १२६४१२ (१४-१२-२०१८) श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.संदीप नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीमती उर्मिला अरुण धुमाळ, सरपंच, ग्रामपंचायत लोणी (ता.आंबेगाव, जि.पुणे) यांना ग्रामपंचायत निवडणुकीनंतर अज्ञात भ्रमणध्वनीवरुन अश्लील आणि अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करुन जीवे मारण्याचा धमक्या दिल्या जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तक्रारदार महिलेने भ्रमनध्वनी क्रमांकासह मंचर (ता.आंबेगाव, जि.पुणे) येथील पोलीस स्टेशनमध्ये दिनांक २८ जुलै, २०१८ रोजी वा त्यासुमारास तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.लोकप्रतिनिधींनी दिनांक ३ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री महोदय यांना पत्राव्दारे कळवूनही याबाबत शासनाने कोणतीच कारवाई केली नसल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनाने कोणती कारावाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-१२-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे. फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरुन मंचर पोलीस स्टेशन पुणे येथे गु.र.नं.३०९/२०१८ भादंवि कलम ३५४(ड), ५०७, ३४ सह माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) व (४) फिर्यादीने दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने आरोपीचे मोबाईल कॉल्स डिटेल आणि कस्टमर ॲप्लिकेशन फॉर्म मागविण्यात आले, परंतू आरोपी हे एकाच भ्रमणध्वनीमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे सीम कार्ड टाकून फिर्यादीस फोन आणि मेसेज करीत असल्याने, सदर ॲप्लिकेशन फॉर्म हस्तगत करुन दोन आरोपींना सदर गुन्हयांचे अनुषंगाने अटक करण्यात आलेली आहे. सध्या आरोपी न्यायालयीन कोठडीमध्य अटकेत आहेत. सदर गुन्हयाचा तपास पूर्ण झाला असून गुन्हयाचे दोषारोप पत्र मा.न्यायालयात सादर करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिपळूण (जि.रत्नागिरी) पोलिस ठाण्यात एका राजकीय पक्षाचे प्रवक्ते यांचे विरुध्द गुन्हा दाखल केल्याबाबत**

**(४६) १२६६७४ (०६-१२-२०१८) श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण (जि.रत्नागिरी) पोलिस ठाण्यात एका राजकीय पक्षाचे प्रवक्ते, माजी आमदार व मुंबई म्हाडाचे अध्यक्ष यांचे विरुध्द फसवणूक व त्यांनी एका महिलेवर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी गुन्हा दिनांक २६ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास नोंदविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नूसार दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०१-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी फिर्यादीने दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने माजी आमदार व मुंबई म्हाडाचे अध्यक्ष यांचे विरुध्द चिपळूण पोलीस ठाणे येथे गु.र.नं.२४४/२०१८, भा.दं.वि.क. ३७६ (एफ) (एन), ३५४, ४२०, ५०४, ५०६ प्रमाणे दिनांक २५.०९.२०१८ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचे अनुषंगाने साक्षिदारांकडे तपास करण्यात आला आहे. घटनास्थळाचा पंचानामा करण्यात आला असून, फिर्यादीची वैद्यकिय तपासणी करण्यात आली आहे. फिर्यादी व आरोपी यांच्यात सन २००२ ते २०११ या कालावधीत झालेल्या घटनांचा उल्लेख असलेल्या संभाषणाची सीडी फिर्यादीने सादर केली आहे. आरोपी यांचा आवाजाचा नमूना ध्वनीमुद्रीत करण्यात आला आहे. फिर्यादीचा आवाजाचा नमूना घेणे बाकी आहे. फिर्यादीचा आवाजाचा नमूना प्राप्त झाल्यानंतर वैज्ञानिकदृष्ट्या तपासणी होणेकरिता सहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, मुंबई यांचे अभिप्रायासाठी पाठविण्यात येईल. सदर अभिप्राय प्राप्त करुन आरोपीवर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्याची तजवीज ठेवली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अचलपूर (जि.अमरावती) मतदार संघातील आसेगाव, शिरजगाव कसबा, चांदूर बाजार येथील मंजूर ग्रामीण पोलीस प्रशासकीय इमारतींच्या कामांकरीता निधी उपलब्ध करून देण्याबाबत**

**(४७) १२८०६२ (०७-१२-२०१८) श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अचलपूर (जि.अमरावती) मतदार संघातील आसेगाव, शिरजगाव कसबा, चांदूर बाजार येथील मंजूर ग्रामीण पोलीस प्रशासकीय इमारतींच्या कामांना निधी उपलब्ध करून देण्यासाठी लेखी निवदेन मा.लोकप्रतिनिधी, अचलपूर यांनी दिनांक ११ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने उपरोक्त ठिकाणी पोलीस प्रशासकीय इमारतींच्या कामांना प्रशासकीय मंजुरी माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान देण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रशासकीय मंजूरी मिळूनही अद्याप निधी उपलब्ध झालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मा.लोकप्रतिनिधी यांनी मागणी केल्यानुसार निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०१-२०१९) :** (१) होय.
(२) पोलीस स्टेशन आसेगाव व शिरजगाव कसबा येथील प्रशासकीय इमारत बांधकामास दिनांक १९.०६.२०१७ रोजी तर पोलीस स्टेशन चांदूरबाजार येथील प्रशासकीय इमारत बांधकामास दिनांक १६.०३.२०१७ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.
(३) व (४) पोलीस स्टेशन आसेगाव येथील प्रशासकीय इमारत बांधकामास सन २०१८-१९ मध्ये निधी वितरीत करण्याची तजवीज ठेवली आहे. तर पोलीस ठाणे शिरजगाव कसबा प्रशासकीय इमारत बांधकामास रु.८९,०३,०००/- व पोलीस ठाणे चांदूरबाजार प्रशासकीय इमारत बांधकामास रु.७०,००,०००/- इतका निधी वितरीत करण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मौजा वांजरी (ता.वणी, जि.यवतमाळ) येथील पाच व्यक्तींनी ग्रामपंचायतीला कुलूप लावल्याबाबत

**(४८) १२८२६५ (०७-१२-२०१८) श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजा वांजरी (ता.वणी, जि.यवतमाळ) येथील पाच व्यक्तींनी कोणतीही पूर्वसूचना न देता दिनांक ४ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास मौजा वांजरी ग्रामपंचायतीला कुलूप लावून शासकीय कामात अडवणूक व शांतता भंग केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकरणी त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी सरपंच, ग्रामपंचायत वांजरी यांनी लेखी निवेदनाद्वारे शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त तक्रारीनंतर संबंधीत पाचही व्यक्तींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करून संबंधीतांवर शासनाने कोणती कारवाई केली करण्यात वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

वि.स. ५२१ (४०)

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०१-२०१९) :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

मौजा वांजरी, ता.वणी, जि.यवतमाळ येथील ग्रामपंचायत सदस्यासह तीन व्यक्तींनी वॉर्ड क्रमांक ३ मध्ये पाणी टंचाईचे कारणावरुन दिनांक ४ मे, २०१८ रोजी ग्रामपंचायतला कुलूप लावून शासकीय कर्मचाऱ्यांना शासकीय काम करण्यास अटकाव केला.

(२), (३) व (४) होय, हे खरे आहे.

सरपंच, वांजरी ग्रामपंचायत यांनी पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ येथे दिनांक ०९.०५.२०१८ रोजी ई-मेलवरुन निवेदन दिले आहे. प्राप्त तक्रारीवरुन पोलीस स्टेशन वणी, जि.यवतमाळ येथे गु.र.क्र.५८६/१८ कलम ३४१, १८६, ३४ भादंवि अन्वये तीन आरोपिंविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर आरोपिंना कलम ४१(अ) सी.आर.पी.सी. अन्वये अटकेशिवाय नोटीस देवून मा.न्यायालयासमक्ष हजर रहाणेबाबत सूचनापत्र देण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तासगांव शहरात (जि.सांगली) छत्रपती शिवाजी महाराजांचा नविन अश्वारुढ पुतळा उभारण्याबाबत

**(४९) १२८६४६ (१०-१२-२०१८) श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तासगांव शहरात (जि.सांगली) गुरुवारपेठ येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा नविन अश्वारुढ पुतळा उभारण्याबाबतची मागणी गत २ वर्षांपासून होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जुना पुतळा काढून त्या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांचा नविन अश्वारुढ पुतळा बसविण्याबाबत परवानगी घेण्यात आली होती काय, असल्यास केंव्हा,

(३) असल्यास, शिवाजी महाराजांचा नविन अश्वारुढ पुतळा बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०१-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) छत्रपती शिवाजी महाराजांचा नवीन अश्वारूढ पुतळा उभारण्याबाबतचे आदेश जिल्हाधिकारी, सांगली यांचेकडून दिनांक २.११.२०१८ अनव्ये निर्गमित करण्यात आले आहेत. छत्रपती शिवजी महाराजांचा नवीन अश्वारूढ पुतळा छत्रपती शिवाजी महाराज समितीमार्फत बसविण्यात येणार आहे. पुतळा उभारण्याकामी चबुतरा बांधण्याचे काम ९०% पूर्ण झालेले असून उर्वरित काम पुतळा बसविल्यानंतर पूर्ण करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आणीबाणीच्या विरोधात लढा देत बंदीवास सोसलेल्या व्यक्तींच्या सन्मानार्थ राज्य सरकारने जाहीर केलेल्या मानधन योजनेबाबत**

**(५०) १३०५७८ (०७-१२-२०१८) श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आणीबाणीच्या विरोधात लढा देत बंदीवास सोसलेल्या व्यक्तींच्या सन्मानार्थ राज्य सरकारने जाहीर केलेल्या मानधन योजनेसाठी अद्यापपर्यंत २ हजार ४५५ जणांनी अर्ज केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू योजनेचे स्वरूप काय आहे व एकुण किती लाभार्थ्यांना याचा लाभ देण्यात आला आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०१-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) सन १९७५ ते १९७७ मधील आणिबाणीच्या कालावधीत लोकशाहीकरीता लढा देणाऱ्या व्यक्तींना बंदिवास सोसावा लागला अशा व्यक्तींचा सन्मान/ यथोचित गौरव करण्यासंबंधी शासन निर्णय क्र.निवृवे-१०१५/प्र.क्र.२६१/२०१५/(२०१८)/ स्वासैक-१, दिनांक ०३/०७/२०१८ अन्वये "आणीबाणीच्या काळात एक महिन्यापेक्षा जास्त कारावास भोगलेल्या व्यक्तींना दरमहा दहा हजार व त्यांच्या पश्चात त्यांच्या पत्नीस/ पतीस पाच हजार रूपये मानधन देण्यात येईल तर एक महिन्यापेक्षा कमी कारावास भोगलेल्या व्यक्तींना दरमहा रूपये पाच हजार, तर त्यांच्या पश्चात त्यांच्या पत्नीस/ पतीस रूपये अडीच हजार रूपये मानधन देण्यात येईल" असे धोरण ठरविण्यात आले आहे.लाभार्थ्यांना लाभ देण्याची कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **जितेंद्र भोळे**

**मुंबई.** **सचिव (कार्यभार),**

**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.